0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १८/०८/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५८/२०११/जा.६९२, दि.२५/०८/२०११, दि.१९/०९/२०१ व ०१/१०/२०११

३) ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ तसेच एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक सचिन दशरथलाल यादव, एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे व्यवस्थापक दुधनाथ जयश्री यादव व ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ चे चालक रमाकांत राय यादव यांचे दिनांक ०८/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

४) टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे चालक/मालक जमील अहमद हबीबउल्लाह खान यांचे दिनांक १४/०९/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांचे दिनांक २७/०९/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

६) टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे चालक/मालक जमील अहमद हबीबउल्लाह खान यांचे दिनांक ११/१०/२०११ रोजीचे ी लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५८/२०११/जा. ९४०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :- १९ /११/२०११

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह दिनांक १०/०८/२०११ रोजी सायंकाळी एस दशरथ ट्रान्सपोर्ट, ९० फुट रोड, गणेश मंदिर जवळ, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ७२ येथे अचानक पोहचले. एस दशरथ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयासमोर ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ उभा असलेला आढळला व त्यालाच लागून उभा असलेला तीन चाकी मीनीडोअर टेम्पो

क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ आढळला. त्यामधून २२० लिटर क्षमतेचे पत्र्याचे ड्रम हलवित असतांना अधिकारी वर्ग पंचासमवेत सदर टेम्पो जवळ पोहचले व सदर काम करीत असलेल्या व्यक्तीस ताब्यात घेतले.

अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीस त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव जमील अहमद हबीबउल्लाह खान असे सांगून तो गाडी क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चा चालक असल्याचे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ रोजी तो खैरानी रोड येथे येण्यासाठी टेम्पो घेऊन निघाला असता रस्त्यामध्ये नाझ हॉटेल मागे रस्त्यावर विद्याविहार येथे उभ्या असलेल्या एका अनोखळी व्यक्तीने हात दाखवून त्याला थांबविले व त्या व्यक्तीचा टेम्पो (टेम्पो क्रमांक माहित नसल्याचे सांगितले) पंचर झाल्याचे सांगून त्यामधील असलेले ६ ड्रम एस. दशरथ ट्रान्सपोर्ट, ९० फुट रोड, गणेश मंदिर जवळ, साकीनाका, अंधेरी (पू) येथे नेण्याकरीता रुपये ४५०/- असे भाडे ठरविले. सदर व्यक्तीने त्याचे नाव शंकर (पूर्ण नाव माहित नसल्याचे सांगितले) असे त्याला सांगितले. त्याप्रमाणे सदरचे ६ ड्रम घेऊन ते एस. दशरथ ट्रान्सपोर्ट, साकीनाका येथे पोहचले. त्याच्या टेम्पोमध्ये २ ड्रम टाकल्यानंतर तिसरा ड्रम हलवत असतानाच अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. तसा त्यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

तद्नंतर त्याच्या बाजूस उभ्या असलेल्या व्यक्तीस त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रमाकांत राय यादव असे सांगितले. तसेच तो एस दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मागील १५ दिवसापासून टेम्पो चालक म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ रोजी बोईसर येथील तारापूर एम.आय.डी.सी. येथे भाडे घेऊन जावयाचे असल्यामुळे दुपारी १ ते १:३० वाजण्याच्या सुमारास गोरेगांव येथील सोनावाला क्रॉसरोड येथे असलेल्या एस. दशरथ ट्रान्सपोर्टच्या दुसऱ्या कार्यालयामधून साकीनाका येथील कार्यालयासमोर टेम्पो क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ घेऊन आला व तेथे त्यांनी टेम्पो उभा केला. साधारण ३:३० ते ४:०० वाजण्याच्या सुमारास तीन टेम्पोमधून (टेम्पो क्रमांक माहित नसल्याचे सांगितले) २२० लिटर क्षमतेचे प्रत्येकी ६ ड्रम प्रमाणे एकूण १८ ड्रम ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये लोड करण्यात आले. तद्नंतर तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मधून आणलेल्या २२० लिटर क्षमतेच्या ६ ड्रमपैकी २ ड्रम ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मधून लोड करण्यात आले व ३ ड्रम लोड करीत करण्याकरिता हलवत असतांना अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. वरील प्रमाणे त्यांचा जबाब नोंदविण्यात आला.

तद्नंतर ट्रक समोरील गाळ्यामध्ये एस. दशरथ ट्रान्सापोर्टच्या कार्यालयात बसलेल्या व्यक्तीस अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव दुधनाथ जयश्री यादव असे सांगितले. सदर व्यक्तीने एस. दशरथ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात तो व्यवस्थापक म्हणून काम करतो असे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ राजी दुपारी ३:३० वाजता शंकर नावाच्या व्यक्ती (पूर्ण नाव माहित नाही) तीन चाकी टेम्पो मध्ये २२० लिटर क्षमतेचे ६ ड्रम घेऊन आला व त्याने तारापूर एम.आय.डी.सी. एरियामध्ये पोहच करण्यासाठी सांगितले. तसेच त्याचे भाडे गोरेगांव

येथील कार्यालयात ठरविले जाते असे जबाबात सांगितले. तद्नंतर शंकर नावाच्या व्यक्ती आणखी २ तीन चाकी टेम्पोमधून २२० लिटर क्षमतेचे १२ ड्रम घेऊन आला. शेवटच्या टेम्पोमधील ड्रम टाटा कंपनीच्या ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये पाठवित असतांना अधिकाऱ्यांनी उपरोक्त दोन व्यक्तींना ताब्यात घेतले. तद्नंतर १४ ड्रम टाटा कंपनीचा ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ व टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मध्ये असलेले ४ ड्रम असे एकूण १८ ड्रमची पहाणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी पंचासह सदर व्यवस्थापकास सोबत घेऊन गेले व लोखंडी पकडीच्या सहाय्याने लोखंडी ड्रमची झाकणे उघडून तोटीच्या सहाय्याने सदर ड्रममधील द्रवपदार्थ तपासला असता ते निळ्या रंगाचे केरोसिन असल्याचे आढळले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासनाने अनुदानित दराने फक्त शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकांद्वारे पात्र शिधापत्रिकाधारकांना उपलब्ध करुन दिलेल्या शासन नियंत्रित केरोसिनची अनधिकृतपणे व बेकायदेशिररित्या खरेदी, विक्री, साठवणूक व वाहतूक केल्याचे संकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ [२] दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज अॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ तसेच [३] बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन ऑर्डर १९८६ चे कलम ४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे वि.स्था.खु.क्र.३३/२०११ दि.११/०८/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठ्यातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ | १ नग | ११,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील १४ ड्रममध्ये असलेले निळे केरोसिन | ३०८० लिटर | १,६१,८२३/- |
| ३ | टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ | १ नग | ६०,०००/- |
| ४ | उक्त टेम्पोमधील ४ ड्रममध्ये असलेले निळे केरोसिन | ८८० लिटर | ४६,२३५/- |
| ५ | रिकामे ड्रम | १८ नग | ४,५००/- |
| | | एकूण | १३,७२,५५८/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उप नियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली असून, त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल

सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०९/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ तसेच एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक सचिन दशरथलाल यादव, एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे व्यवस्थापक दुधनाथ जयश्री यादव व ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ चे चालक रमाकांत राय यादव उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि. २७/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

त्याचप्रमाणे ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ तसेच एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक सचिन दशरथलाल यादव यांनी सादर केलेल्या निवेदनासोबत जप्त द्रवपदार्थाच्या वाहतूकीबाबत चलन सादर केले असून, सदर चलन पहाता, जप्त द्रवपदार्थ हा मे.महाराष्ट्र ट्रेडर्स, सांताक्रूझ, मुंबई येथून मे. महावीर टिंबर तारापूर जि. ठाणे येथे पाठविण्याकरीता जप्त टेम्पोमध्ये भरला असल्याचे दिसून येते. सबब, मे. महाराष्ट्र ट्रेडर्स, सांताक्रूझ व मे. महावीर टिंबर, तारापूर, जि. ठाणे यांना नोटीस बजावून दि.२७/०९/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २७/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस तथा पोलीस उप निरीक्षक श्री व्ही. टी. तांबे उपस्थित राहीले व त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस जमील अहमद हबीबउल्लाह खान उपस्थित राहीले व ते टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे चालक/ मालक असल्याचे सांगून वाचावे क्र. ४ अन्वये यापूर्वीच टपालामार्फत निवेदन दिल्याचेही सांगीतले. इतर आरोपी/अपचारी सदर सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी तसेच मे. महाराष्ट्र ट्रेडर्स, सांताक्रूझ व मे. महावीर टिंबर, तारापूर यांचे वतीने कोणीही उपस्थित राहीले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रवपदार्थ ज्वलनशील असल्याने त्याची तात्काळ विल्हेवाट लावणे अगत्याचे आहे. सबब, प्रकरण गुणवत्तेवर एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ तसेच एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक सचिन दशरथलाल यादव यांनी युक्तीवाद केला की, सदर जप्त टेम्पो हा एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे नावे नोंदणी असून, ते या ट्रान्सपोर्ट कंपनीचे स्वत: मालक आहेत. त्यांच्या ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून, ज्या मालाची

बुकींग केली जाते, त्याची या टेम्पोने वाहतूक केली जाते. दिनांक १०/०८/२०११ रोजी अंदाजे दुपारी ०३.३० वाजता टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ हा त्यांच्या ट्रान्सपोर्टमध्ये आला व महाराष्ट्र ट्रेडर्स यांनी दिलेली बिल पावती दाखवून १८ बॅरेल वेस्ट टर्पेंटाईन ऑईल मे महावीर ट्रेडर्स तारापूर येथे नेण्याकरीता बूकींग केले. महाराष्ट्र ट्रेडर्स यांनी केलेल्या बूकींगनुसार १८ बॅरेल वेस्ट टर्पेंटाईन ऑईलची वाहतूक करण्यासाठी चलन क्र.२७०८२ बनवीले. टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मधून आलेले १८ बॅरेल वेस्ट टर्पेंटाईन ऑईल त्याच्या ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये भरणे सुरु केले, १४ बॅरेल भरले असतांना अधिकारी तेथे आले व टेम्पो जप्त केला असल्याचे त्याला ट्रान्सपोर्ट मॅनेजरने फोनवरुन सांगीतले. त्याचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असल्याने मालाचे बिल पाहूनच बूकींग करीत असतात. परंतू बिलामध्ये लिहीलेला मालच आहे किंवा नाही, हे पहात नाही. या गुन्ह्यात जप्त केलेले १८ ड्रममध्ये केरोसीन असल्याचे त्यांना माहित नाही. ड्रम नवीन व पुर्णपणे बंद होते. या गुन्ह्याशी त्याचा ट्रान्सपोर्ट व टेम्पोशी काहीही संबंध नाही. हा टेम्पो त्याने गेल्या आठ महिन्यापूर्वी बँकेतून कर्ज काढून नवीनच घेतेलेला आहे. या टेम्पोच्या व्यवसायावरच त्यांच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. तरी जप्त केलेला टेम्पो क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ त्याला परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

सुनावणीस उपस्थित एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे व्यवस्थापक दुधनाथ जयश्री यादव यांनी वरीलप्रमाणेच युक्तिवाद करुन तसे निवेदन सादर केले आहे.

सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ चे चालक रमाकांत राय यादव यांनी युक्तीवाद केला की, तो या कामावर नवीनच रुजू झाला असून, जप्त टेम्पोवर तो चालक म्हणून गेल्या १५ दिवसांपासून काम करीत आहे. ट्रान्सपोर्टचे व्यवस्थापक यांनी त्याला साकीनाका शाखेमध्ये बूकींग केलेला माल भरण्यासाठी बोलावले होते. दिनांक १०/०८/२०११ रोजी अंदाजे दुपारी ०३.०० वाजता तो ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ तेथे घेवून आला. टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ हा माल भरुण उभा होता. त्यातील माल तारापूर येथे जाईल असे व्यवस्थापकाने त्याला सांगीतले. ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये भरणे सुरु केले, १४ बॅरेल भरले असतांना अधिकारी तेथे आले व टेम्पो जप्त केला. दुधनाथ यादव हे ट्रान्सपोर्टमध्ये व्यवस्थापक असल्याने मालाचे सर्व बूकींग ते स्वतः करीत असतात. या प्रकरणात त्याचा काहीही दोष नाही व त्याला काहीही माहीती नाही. तरी जप्त केलेला टेम्पो क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ त्याच्या मालाकास परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ शी संबंधित जमील अहमद हबीबउल्लाह खान यांनी युक्तीवाद केला की, तो व्यवसायाने टेम्पोचा चालक व मालक असून, केवळ मिळेल ते भाडे घेत असतो. त्याचा थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ अधिकाऱ्यांनी अडविला तेव्हा टेम्पोत काय आहे, असे अधिकाऱ्यांनी विचारले असता, टेम्पोत माल असून, एका अनोळखी इसमाने त्याचा टेम्पो थांबविला व त्या इसमाचा

टेम्पो पंचर झाल्याचे सांगून त्या टेम्पोमध्ये असलेले ६ ड्रम एस. दशरथ ट्रान्सपोर्ट साकीनाका, अंधेरी येथे घेवून जायचे आहे. नेहमीप्रमाणे भाडे मिळाले म्हणून रुपये ४५०/- मोबदला घेवून तो त्याच्या टेम्पोमध्ये सदर ६ ड्रम घेवून आला. त्यानंतर त्याला कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. सदरहू मालाबाबत त्याचा काहीही संबंध नसल्याने त्याला या प्रकरणातून निर्दोष मुक्त करावे. कारण या टेम्पोच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

सुनावणीस उपस्थित तपासी पोलीस अधिकारी यांनी युक्तिवाद केला की, सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल हा पोलीस ठाणे कंपाऊंडमध्ये असून, तो स्फोटक असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने सदरचा मुद्देमाल पोलीस ठाणे कंपाऊंडमध्ये ठेवणे योग्य नसल्याने सदरच्यां मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याबाबत योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

प्रस्तुत प्रकरणातील इतर आरोपी/अपचारी तसेच जप्त मुद्देमालाचे मालक यांना पुरेसी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १०/०८/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह दिनांक १०/०८/२०११ रोजी सायंकाळी एस दशरथ ट्रान्सपोर्ट, ९० फुट रोड, गणेश मंदिर जवळ, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ७२ येथे अचानक पोहचले. एस दशरथ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयासमोर ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ उभा असलेला आढळला व त्यालाच लागून उभा असलेला तीन चाकी मीनीडोअर टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ आढळला. त्यामधून २२० लिटर क्षमतेचे पत्र्याचे ड्रम हलवित असतांना अधिकारी वर्ग पंचासमवेत सदर टेम्पो जवळ पोहचले व सदर काम करीत असलेल्या व्यक्तीस ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव जमील अहमद हबीबउल्लाह खान असे सांगून तो गाडी क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चा चालक असल्याचे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ रोजी तो खैरानी रोड येथे येण्यासाठी टेम्पो घेऊन निघाला असता रस्त्यामध्ये नाझ हॉटेल मागे रस्त्यावर विद्याविहार येथे उभ्या असलेल्या एका अनोखळी व्यक्तीने हात दाखवून त्याला थांबविले व त्या व्यक्तीचा टेम्पो पंचर झाल्याचे सांगून त्यामधील असलेले ६ ड्रम एस. दशरथ ट्रान्सपोर्ट, ९० फुट रोड, गणेश मंदिर जवळ, साकीनाका, अंधेरी (पू) येथे नेण्याकरीता रुपये ४५०/- असे

भाडे ठरविले. सदर व्यक्तीने त्याचे नाव शंकर असे त्याला सांगितले. त्याप्रमाणे सदरचे ६ ड्रम घेऊन ते एस. दशरथ ट्रान्सपोर्ट साकीनाका येथे पोहचले. त्याच्या टेम्पोमध्ये २ ड्रम टाकल्यानंतर तिसरा ड्रम हलवत असतानाच अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला. तद्नंतर त्याच्या बाजूस उभ्या असलेल्या व्यक्तीने त्याचे नाव रमाकांत राय यादव असे सागून तो एस दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मागील १५ दिवसापासून टेम्पो चालक म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ रोजी बोईसर येथील तारापूर एम.आय.डी.सी. येथे भाडे घेऊन जावयाचे असल्यामुळे दुपारी १ ते १:३० वाजण्याच्या सुमारास गोरेगांव येथील सोनावाला क्रॉसरोड येथे असलेल्या एस. दशरथ ट्रान्सपोर्टच्या दुसऱ्या कार्यालयामधून साकीनाका येथील कार्यालयासमोर टेम्पो क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ घेऊन आला व तेथे त्यांनी टेम्पो उभा केला. साधारण ३:३० ते ४:०० वाजण्याच्या सुमारास दोन टेम्पोमधून २२० लिटर क्षमतेचे प्रत्येकी ६ ड्रम प्रमाणे एकूण १२ ड्रम ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये लोड करण्यात आले. तद्नंतर तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मधून आणलेल्या २२० लिटर क्षमतेच्या ६ ड्रमपैकी २ ड्रम ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मधून लोड करण्यात आले व ३ ड्रम लोड करीत करण्याकरिता हलवत असतांना अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. वरील प्रमाणे त्यांचा जबाब नोंदविण्यात आला. तद्नंतर ट्रक समोरील गाळ्यामध्ये एस. दशरथ ट्रान्सापोर्टच्या कार्यालयात बसलेल्या व्यक्तीने त्याचे नाव दुधनाथ जयश्री यादव असे सांगितले. सदर व्यक्तीने एस. दशरथ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात तो व्यवस्थापक म्हणून काम करतो असे सांगितले. दिनांक १०/०८/२०११ राजी दुपारी ३:३० वाजता शंकर नावाच्या व्यक्ती तीन चाकी टेम्पो मध्ये २२० लिटर क्षमतेचे ६ ड्रम घेऊन आला व त्याने तारापूर एम.आय.डी.सी. एरियामध्ये पोहच करण्यासाठी सांगितले. तसेच त्याचे भाडे गोरेगांव येथील कार्यालयात ठरविले जाते असे जबाबात सांगितले. तद्नंतर शंकर नावाच्या व्यक्ती आणखी २ तीन चाकी टेम्पोमधून २२० लिटर क्षमतेचे १२ ड्रम घेऊन आला. शेवटच्या टेम्पोमधील ड्रम टाटा कंपनीच्या ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये पाठवित असतांना अधिकाऱ्यांनी उपरोक्त दोन्ही व्यक्तींना ताब्यात घेतले. तद्नंतर १४ ड्रम टाटा कंपनीचा ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ व टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मध्ये असलेले ४ ड्रम असे एकूण १८ ड्रमची पहाणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी पंचासह सदर व्यवस्थापकास सोबत घेऊन गेले व लोखंडी पकडीच्या सहाय्याने लोखंडी ड्रमची झाकणे उघडून तोटीच्या सहाय्याने सदर ड्रममधील द्रवपदार्थ तपासला असता ते निळ्या रंगाचे केरोसिन असल्याचे आढळले. यावरुन सदरचे दोन्ही टेम्पो व त्यामधील १८ ड्रममधील ३९६० लिटर निळे केरोसीनचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक तसेच इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे

तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

सुनावणीचेवेळी जप्त टेम्पोचे मालक सचिन दशरथ यादव यांनी केलेल्या खुलाशात, महाराष्ट्र ट्रेडर्स यांनी १८ ड्रम टर्पेंटाईन ऑईल मे. महावीर ट्रेडर्स तारापूर येथे नेण्याकरीता केलेल्या सदर टर्पेंटाईन ऑईलची वाहतूक करण्यासाठी चलन क्र.२७०८२ बनवून टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ मधून आलेले १८ बॅरेल वेस्ट टर्पेंटाईन ऑईल त्याच्या ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ मध्ये भरले असल्याचे नमुद केले आहे. तथापी, टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे चालक/मालक जमील अहमद हबीबउल्लाह खान यांनी केलेल्या खुलाशात, एका अनोळखी इसमाने सदर टेम्पो थांबवून त्या इसमाचा टेम्पो पंचर झाल्याने त्या टेम्पोमध्ये असलेले ६ ड्रम एस.दशरथ ट्रान्सपोर्ट साकीनाका, अंधेरी येथे घेवून जायचे आहे असे सांगीतल्याने नेहमीप्रमाणे भाडे मिळाले म्हणून रुपये ४५०/- मोबदला घेवून त्याने सदर ६ ड्रम त्या ठिकाणी घेवून आला. परंतू कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याचे नमुद केले आहे. म्हणजेच दोन्ही टेम्पो मालकाने केलेले खुलासे एकमेकाशी विपर्यास्त असून, मोघम स्वरुपाचे दिसून येतात. सदर जप्त टेम्पोमध्ये वेस्ट टर्पेंटाईन ऑईल असल्याचे नमुद करुन तसे बिल सादर केले असले तरी, घटनेच्या वेळी अधिकाऱ्यांना १८ ड्रममध्ये निळे केरोसीन असल्याचे आढळून आले आहे. यावरुन आरोपी यांनी स्वत:च्या फायद्यासाठी जाणीवपूर्वक शासन नियंत्रीत निळे केरोसिनची अवैधमार्गाने व बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री, वाहतूक व साठवणूक केल्याचे सिध्द होते. सबब, प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ हा एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीचे नावे नोंदणी असून सचिन दशरथलाल यादव मालक असल्याचे तसेच जप्त टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ हा जमील अहमद हबीबउल्लाह खान यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी सादर केलेल्या खुलांशात, वेस्ट टर्पेंटाईन ऑईल तारापूर येथे पोहचविण्याची बुकिंग केल्यानुसार सदर ऑईलची टेम्पोने वाहतूक केली असून, या टेम्पोवर त्याचे कुटूंबाचे उदरनिर्वाह चालत असल्याने जप्त टेम्पो त्याला परत मिळावा, असे नमुद केले आहे. तथापी, शासन नियंत्रित केरोसीनची वाहतुक करण्यासाठी सदर दोन्ही टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ व टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ हा त्यांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा वाहन मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या

निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी दोन्ही वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे वि.स्था. गुन्हा नोंद क्र. ३३/२०११ दि.११/०८/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण ३९६० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ई - परिमंडळ कार्यालय, वडाळा यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ व टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ हे दोन्ही वाहने शासनजमा करण्यात येत आहे. सदर दोन्ही वाहन त्यांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास त्यांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा वाहन मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) रिकामे होणारे २२० लिटर क्षमतेचे एकूण १८ ड्रम पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0010

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे चालक, जमील अहमद हबीबउल्लाह खान
२) टेम्पो क्र. एमएच-०४-सीयू-९८६५ चे मालक
३) ट्रक क्र. एमएच-०४-एफडी-४३१७ चे मालक
४) रमाकांत राय यादव, एस दशरथ ट्रान्सपोर्ट कंपनीमधील टेम्पो चालक
५) शंकर
६) दुधनाथ जयश्री यादव, व्यवस्थापक, एस. दशरथ ट्रान्सपोर्ट कार्यालय
७) जप्त केरोसिनचे मालक
८) मे. महाराष्ट्र ट्रेडर्सचे मालक, कुर्ला कलिना रोड, पनामा कंपाऊड,सांताक्रुझ (पूर्व) मुंबई - २९
९) मे. महावीर टिंबर, तारापूर यांचे मालक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ई -परिमंडळ, वडाळा यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.